## प्रेसनोट दि. १९/०९/२०१७

## सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांचे कडुन पंचतारांकित हॉटेल वर छापा कारवाईद्वारे २ परदेशी व १ भारतीय अशा एकुण ३ महिलांची हायप्रोफाईल वेश्याव्यवसायातुन सुटका

दि.१८/०९/२०१७ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग,गुन्हे शाखेला मिळालेल्या माहीती नुसार एका पंचतारांकित हॉटेल मध्ये रशियन, ऊझबेकिस्तान, दिल्ली, या हायप्रोफाईल परदेशी व विविध राज्यातील मुलींना जादा पैशाचे अमिष दाखवून अवैध्य वेश्याव्यवसाय करवुन घेत असल्याची माहीती मिळाले वरुन, गुन्हे शाखेच्या पथकाकडुन पडताळणीद्वारे छापा कारवाई करण्यात आली.

इसम नामे राहुल उर्फ राजु हा आपले साथीदार एजंटसच्या मदतीने देशातील व परदेशातील मुली वेश्याव्यवसायासाठी मिळवुन वेगवेगळ्या हॉटेल मध्ये त्यांचे नावे रुम बुक करुन तेथे ठेवुन, वेश्यागमनासाठीच्या ग्राहकांबरोबर मोबाईल फोनच्या माध्यमातुन संपर्क साधुन, वेश्यागमनासाठीची रक्कम ठरवुन ग्राहकांना नमुद हॉटेल रुम्समध्ये पाठवुन मुलींकडुन वेश्याव्यवसाय करवुन घेत असले बाबत मिळालेल्या माहीती वरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहर चे पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी व कर्मचारी यांनी पंचतारांकित हॉटेलमध्ये चालत असलेल्या हायप्रोफाईल वेश्याव्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. छाप्या दरम्यान दोन परदेशी मुली- त्यापैकी एक रशियन व एक ऊझबेकिस्तान येथील, तसेच एक दिल्ली येथील मुलगी अशा एकुण तीन सज्ञान पिडीत मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन आरोपीत इसमनामे १) राहुल ऊर्फ राजू २) जॉन ऊर्फ प्रकाश शर्मा ऊर्फ जतीन चावला ३) सागर ४) टोनी एजंट मुंबई ५) सुरेश एजंट पुणे या आरोपीतांचे विरुध्द येरवडा पो.स्टे. ७५७/२०१७ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम. १९५६ कलम ३,४,५ सह भा.दं.वि.क. ३७०, ३७० अ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.संजय निकम, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री.संजय पाटील, मसपोनि शितल भालेकर, सपोनि चंद्रकांत जाधव, नितिन तेलंगे, नामदेव शेलार, नितीन लोंढे, , सचिन कदम, प्रदिप शेलार, विजय काळे, प्रमोद म्हेत्रे, गितांजली जाधव, सरस्वती कागणे, रुपाली चांदगुडे, सचिन शिंदे यांनी केलेली आहे.